


दैनिक
# डोंगरचा राजा
www.dongarcharaja.com
email:dongarcharaja@gmail.com
संपादक-अनिल वाघमारे Editor-Anil waghmare




बीड (महाराष्ट्र) वर्ष १ ले अंक-३१ मंगळवार दि.१४ जुलै २०२६ पोस्टल परवाना: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 किंमत २ रु. पाने - ४

BEED (Maharashtra) Vol: 1 Issue:31 Date: TUESDAY 14 Jully 2026 Postal Permission: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 Rs. 2/- Pages : 4

## तुकाराम मुंडे यांचा मोठा दणका!

# Bagaria Group वर FDA चा धडक छापा; २.९३ कोटींचे खाद्यतेल जप्त, दोन्ही परवाने निलंबित






छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या धडक कारवाईचा मोठा फटका आता छत्रपती संभाजीनगरातील Bagaria Agro Products आणि Bagaria Vegetable Products Pvt. Ltd. या ऑईल रिपॅकिंग उद्योगांना बसला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने केलेल्या अचानक छाप्यात गंभीर अनियमितता उघडकीस आल्यानंतर तब्बल २.९३ कोटी किमतीचा खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला असून, दोन्ही कंपन्यांचे अन्न व्यवसाय परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी उत्पादन युनिटची सखोल तपासणी केली असता अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. खाद्यतेलाचे रिपॅकिंग अत्यंत अस्वच्छ आणि आरोग्यास अपायकारक वातावरणात सुरू असल्याचे आढळले. तसेच वापरून झालेल्या टिनचा पुन्हा वापर, स्वच्छतेच्या निकषांचे उल्लंघन, उत्पादन प्रक्रियेतील त्रुटी आणि अन्न सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन निदर्शनास आले.

या अनियमिततेमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी थेट तडजोड होत असल्याचे लक्षात घेऊन FDA ने तातडीने कारवाई करत संबंधित कंपन्यांचा मोठा साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाची एकूण किंमत सुमारे २ कोटी ९३ लाख रुपये असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

याशिवाय, अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार दोन्ही कंपन्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. आवश्यक नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालानुसार संबंधितांवर आणखी कठोर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील, असा इशारा दिला आहे. या कारवाईमुळे खाद्यतेल उद्योगात खळबळ उडाली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादक आणि रिपॅकिंग युनिट्समध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मच्छिंद्रनाथ गडाचा सर्वांगीण विकास वेगात; आ.सुरेश धस व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची विकासकामांची पाहणी

### भाविकांसाठी दर्जेदार सुविधा, भव्य मंदिर जीर्णोद्धार आणि गुणवत्तापूर्ण कामांवर भर



आष्टी (अण्णासाहेब साबळे)

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सुरू असलेल्या विकासकामांची सोमवारी (दि. १३ जुलै) आमदार सुरेश धस आणि बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रत्यक्ष पाहणी करून मंदिर जीर्णोद्धार कामांचा आढावा घेतला. गडावरील भव्य मंदिराच्या जीर्णोद्धारासह विविध विकासकामांची भव्यदिव्य, प्रगती आणि सुसज्ज नियोजनाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.

यावेळी भाविकांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपत सर्व विकासकामे उच्च दर्जाची होणार असल्याचा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

गडावर सुरू ▶▶पान २ वर

## पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड। प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



बुधवार दि. १५ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने सकाळी ११ वाजता गेवराई येथे आगमन व शहरातील विविध विकास कामांची आढावा बैठक (स्थळ : नगर परिषद सभागृह, गेवराई), सकाळी ११.४५ वाजता गेवराई येथून पाडळसिंगी ता.गेवराईकडे प्रयाण. दुपारी १२.१० वाजता आगमन व सुपरलक्ष्मी गोल्ड चक्की आटा उद्योगाचा शुभारंभास ▶▶पान २ वर

## राजेगाव येथे ऊसाच्या शेतात अज्ञात व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह; परिसरात खळबळ

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील राजेगाव परिसरात ऊसाच्या शेतात एका अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मात्र, या प्रकरणात हत्या की आत्महत्या याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसून पोलिसांनी सर्व शक्यतांचा विचार करून तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित मृतदेह सुमारे पाच ते सहा दिवसांपूर्वीचा असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मृत व्यक्ती पुरुष असून मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला. त्याच्या अंगावर केवळ अंडरवेअर असल्याचे निदर्शनास आले असून दोन्ही हात पाठीमागे असल्याची माहिती समोर आली आहे. या परिस्थितीमुळे घटनेभोवतीचे गूढ अधिकच वाढले असून मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलीस तातडीने ▶▶पान २ वर

## घरमालकाला खोलीत कोंडून चोरट्यांचा डल्ला; ४ लाख ८० हजारांचा मुद्देमाल लंपास

वडवणी / प्रतिनिधी

घरमालक झोपलेले असताना त्यांच्या खोलीचा दरवाजा बाहेरून बंद करून, अज्ञात चोरट्यांनी शेजारील दोन खोल्यांचे कुलूप तोडून ४ लाख ८० हजार रुपयांची नगदी रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना खापरवाडी तांडा येथे घडली आहे. या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी श्रीरंग खेमा चव्हाण (वय ५०, रा. खापरवाडी तांडा, ता. वडवणी) हे शेती व्यवसाय करतात. ११ जुलै २०२६ रोजी ते आपल्या कुटुंबासह जेवण करून रात्री १२ वाजताच्या सुमारास झोपी गेले होते. दरम्यान, रात्री २:४० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या एका नातेवाईकाने फोन करून परिसरात चोरी झाल्याचे सांगत सावध राहण्यास सांगितले. फिर्यादी यांनी उठून खोलीचा दरवाजा ▶▶पान २ वर

## जयंत पाटील यांनी माझ्या नादी लागू नये; मी उलटा फिरलो तर तुम्हालाही नीट सोडणार नाही-आ.सुरेश धस यांचा इशारा




बीड । प्रतिनिधी

राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसत असून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर जोरदार शब्दांत टीका करत इशारा दिला आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

आमदार सुरेश धस म्हणाले, जयंत पाटील यांनी माझ्या नादी लागू नये. मी जर उलटा ▶▶पान २ वर

## तुकाराम मुंढेंना साखर आयुक्त करा; मग कारखानदारांचे गोड हिशेब बाहेर येईल

### प्रकाश सोळंके यांच्या मागणीवर भाई गंगाभीषण थावरे यांचा टोला

बीड (प्रतिनिधी)

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे साखर आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार द्यावा. त्यामुळे साखर कारखानदारांकडून शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक आणि आर्थिक व्यवहारांची वस्तुस्थिती समोर येईल, अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी केली आहे. तसेच आमदार प्रकाश सोळंके यांनी मुंढे यांची सध्याच्या पदावर कायम नियुक्ती करण्याची केलेली मागणी ही कारखानदारांच्या हिताची असल्याचा टोला त्यांनी लगावला.

थावरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तुकाराम मुंढे हे अधिकारी होण्यापूर्वी शेतकरी पुत्र आहेत. त्यामुळे आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान त्यांना द्यावा, अशी मागणी होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असलेल्या या अधिकाऱ्याने साखर क्षेत्राची अतिरिक्त जबाबदारी स्वीकारल्यास अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या गैरप्रकारांवर पडदा उघडला जाईल असा दावा थावरे यांनी केला.

माजलगावचे कारखानदार असलेले आमदार प्रकाश सोळंके यांनी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन विभागात कायम नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. मात्र मुंढे साखर आयुक्त झाले तर कारखानदारांच्या कारभाराची खरी तपासणी होईल, म्हणूनच त्यांना त्या पदापासून दूर ठेवण्याची धडपड सुरू ▶▶पान २ वर

## आ. संदीप क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश!

### बीडमधील अल्पसंख्याक मुलींच्या सुसज्ज वसतिगृहासाठी नगर विकास विभागाकडून जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित

बीड। प्रतिनिधी

रमजान ईदच्या पर्वावर आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील मुस्लिम व अल्पसंख्याक समाजाला दिलेल्या शब्दाला अखेर राज्य शासनाच्या अधिकृत मंजुरीचे बळ मिळाले आहे. बीड शहरात अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज वसतिगृह उभारण्याच्या मार्गातील जागेची अडचण आता पूर्णपणे दूर झाली आहे.




महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने सोमवारी , दि.१३ जुलै २०२६ रोजी अधिकृत शासन निर्णय जारी करून, बीड नगर परिषदेच्या मालकीची किल्ला मैदान येथील डाक बंगल्याची जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास अंतिम मंजुरी दिली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या हक्काच्या निवासस्थानाचा प्रश्न ▶▶पान २ वर

## श्री.येडेश्वरी मातेच्या चरणी मोहनराव जगताप नतमस्तक; राज्याच्या सुख-समृद्धीसाठी केली प्रार्थना

येरमाळा । प्रतिनिधी

छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन तथा जिल्हा सनियंत्रण समितीचे सदस्य मोहनराव जगताप यांनी धाराशिव जिल्ह्यातील पवित्र तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र येरमाळा येथे जाऊन आदिशक्ती श्री येडेश्वरी मातेचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीच्या पवित्र चरणी नतमस्तक होत राज्यातील जनतेच्या सुख, शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

दर्शनावेळी मोहनराव जगताप यांना श्री येडेश्वरी मातेची आरती करण्याचा पवित्र योग लाभला. या प्रसंगाबद्दल भावना व्यक्त करताना त्यांनी, श्री येडेश्वरी ▶▶पान २ वर



# महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन




बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील महावितरणच्या अनागोंदी कारभार, कागदोपत्री मान्सूनपूर्व दुरुस्ती, ऐच्छिक असतानाही स्मार्ट मीटरची सक्ती, विजेच्या धक्क्याने झालेल्या माऊली गोंडे आणि कृष्णा उगले या दोन शेतकऱ्यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि गेवराई उपविभागीय कार्यालयांतर्गत ५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी करून दोषींवर करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवारी (दि.१३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महावितरणविरोधात घोषणाबाजी करत बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार, महावितरणचे कार्यकारी संचालक (मुंबई) आणि मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

चिंचोटी (ता. वडवणी) येथील माऊली दिलीप गोंडे (वय २६) व हाजीपूर (ता. शिरूर कासार) येथील कृष्णा मच्छिंद्र उगले (वय ३०) यांच्या विजेच्या धक्क्याने झालेल्या मृत्यूची सखोल चौकशी करावी.

संबंधित दोषींवर कठोर कारवाई करून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी. मान्सूनपूर्व दुरुस्तीच्या नावाखाली झालेल्या कामांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी.

ऐच्छिक असलेल्या स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी.

गेवराई उपविभागीय कार्यालयातील कथित ५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.

आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, शेख मुबीन, शेख मुस्ताक, सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), सय्यद सादेक (बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, सामाजिक कार्यकर्ते भिमराव कुटे, हनुमान घोडके, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एल.आर. चाटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा मार्गदर्शक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले.

यावेळी डॉ. गणेश ढवळे यांनी बीड शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले वाहतुकीस अडथळा ठरणारे रोहित्र व वीज खांब तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणीही केली. तसेच महावितरणच्या कामकाजात पारदर्शकता आणून नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नांबाबत प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# बीड शहरात मूलभूत सुविधा देण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च व्हावा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळाची बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेला १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या २० कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग शहराच्या मूलभूत सुविधांच्या विकासासाठी करण्यात यावा, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सोमवारी (दि.२२) निवेदनाद्वारे केली. यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हटले की, नगर विकास विभागाच्या दि. २४ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार बीड नगरपरिषदेला १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार २० कोटी रुपयांचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. या निधीचा वापर शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांच्या उभारणीसाठी प्राधान्याने करण्यात यावा. डॉ. क्षीरसागर यांनी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे थकीत वीजबिल भरून अतिरिक्त वीजभार मंजूर करून घेण्याची मागणी केली. यामुळे शहराला पूर्ण दाबाने वीज उपलब्ध होऊन पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच



अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील अपूर्ण कामे पूर्ण करून सध्या १५-१५ दिवसांनी मिळणारे पाणी ४ ते ५ दिवसांच्या अंतराने उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. शहरातील ज्या भागांमध्ये पाईपलाईन टाकण्यात आली आहे; मात्र पाणीपुरवठा होत नाही, अशा भागांसाठी स्वतंत्र सर्वेक्षण करून झोननिहाय अंदाजपत्रके तयार करावीत, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे. यासोबतच पाण्याचा पुनर्वापर, नगर परिषदेच्या इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंग, बिंदुसरा व करपरा नदीतील पाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर यांसारख्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापनासाठी नगर परिषदेकडे स्वतःची जागा नसल्याने कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंडसाठी जमीन खरेदी करण्यात यावी, तसेच शहर स्वच्छतेसाठी ट्रॅक्टर, कॉम्पॅक्टर, घंटागाड्या आणि अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक वाहने व उपकरणे खरेदी करावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, शुभम धुत, नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, सनी माने, मंगेश धोंगडे, नितीन साखरे, मुन्ना गायकवाड, विठ्ठल गुजर, मिलिंद ठोकळ, सुशील जाधव, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते.


### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : श्री.तुकाराम हारी पवार**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : १) श्री.गणेश पंडीतराव तारळकर २) श्री. अशोक राजाराम भागवत**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४६ मिळकत क्र.४०८४ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) पुर्वपश्चिम ५० फुट दक्षिणेत्तर -४३.०५ फुट एकुण क्षेत्रफळ २०२ चौ.मी.

**पुर्व-माने**
**पश्चिम-आबुज**
**दक्षिण-गंगाधर कुरकुटे**
**उत्तर- रस्ता**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : श्री.मिजास्बी निजाम शेख**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : श्री.संतोष जनार्धन टेकाळे**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४०७ मिळकत क्र.२२९५ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) पुर्वपश्चिम ५० फुट दक्षिणेत्तर -३० फुट एकुण क्षेत्रफळ १३९.४० चौ.मी.

**पुर्व-२० फुट रस्ता**
**पश्चिम-बादाडे यांचा प्लॉट**
**दक्षिण-१५ फुट रस्ता**
**उत्तर- लंगे यांचा प्लॉट**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : श्री.दत्ता गोपिनाथ पाटस्कर**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : श्री.संतोष केरबा गलांडे**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र.३०१७ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणेत्तर -४० फुट एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी.

**पुर्व-सुभाष शिंदे**
**पश्चिम-गंगाधर शिंदे**
**दक्षिण-हनुमंत राऊत**
**उत्तर-१५ फुट रस्ता**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : श्री.दादाराव शाहुराव शिंदे**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : श्री.धमाबाई भिमराव चव्हाण**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र.६३४/२ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) पुर्वपश्चिम ४२ फुट दक्षिणेत्तर -३० फुट एकुण क्षेत्रफळ ११७.१० चौ.मी.

**पुर्व-१५ फुट रस्ता**
**पश्चिम-शेषेराव चव्हाण**
**दक्षिण-महादेव सातपुते**
**उत्तर-विक्रेती**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : १) श्री.कोंडीराम लक्ष्मण गायकवाड २) श्री.अरूण अमृत गायकवाड ३) श्री.विनोद राजाराम जाधव ४) श्री.राहुल गंगाधर गायकवाड**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : श्रीमती. रूबीना जावेद कुरेशी**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४२३ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) ४.७८ आर

| | |
|---|---|
| **तुकडा क्र.०१** | **तुकडा क्र.०३** |
| **पुर्व-२० फुटाचा रस्ता** | **शाम वाघमारे** |
| **पश्चिम-पांडू अंडील** | **अनिल जाधव** |
| **दक्षिण-लंगेचा कंपाऊड** | **२५ फुट रस्ता** |
| **उत्तर-२५ फुट रस्ता** | **किसन चव्हाण** |

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**

### नगर पंचायत कार्यालय, वडवणी
## जाहिरनामा

दि.१३/०७/२०२६

**अर्जदाराचे नाव : श्री.कुलसुम अनिस शेख**
**विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव : श्री.महादेव मुगाजी सातपुते**
**प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४२५ १) प्लॉट क्र. २५ २) प्लॉट क्र.२४ वडवणी येथील आहे.**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत/वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याचे क्षेत्रफळ व चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार -१) प्लॉट क्र.२५ पुर्वपश्चिम १२.१९ मी. दक्षिणेत्तर - ६.०९ मी. एकुण क्षेत्रफळ ७४.२३ चौ.मी. २) प्लॉट क्र.२४ पुर्वपश्चिम १२.१९ मी. दक्षिणोत्तर ६.०९ मी. एकुण क्षेत्रफळ ७४.२३ चौ.मी.

| | |
|---|---|
| **पुर्व-राधेश्याम बाबुलाल सोमाणी** | **राधेश्याम बाबुलाल सोमाणी** |
| **पश्चिम-०६ मीटर रस्ता** | **०६ मीटर रस्ता** |
| **दक्षिण-प्लॉट क्र.२६** | **प्लॉट क्र.२५ व खरेदीदार यांनी आजरोजी खरेदी केलेली जागा** |
| **उत्तर-प्लॉट क्र.२४ व खरेदीदार यांनी आजरोजी खरेदी केलेली जागा** | **प्लॉट क्र.२३** |

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**


**पान १ वरून**

**मच्छिंद्रनाथ गडाचा सर्वांगीण विकास वेगात;...**

असलेला मंदिराचा भव्य-दिव्य जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, भाविकांसाठी मूलभूत सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी, अन्नदान छत्र,स्वच्छता तसेच इतर विकासकामांची सविस्तर माहिती घेऊन आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. विकासकामांमध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही विश्वस्तांनी यावेळी सांगितले.

या पाहणीदरम्यान बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही विविध कामांची बारकाईने पाहणी करत आमदार सुरेश धस व अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव व विश्वस्त यांनी नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण कामांमुळे श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा विकास अधिक गतिमान होईल आणि भाविकांना आधुनिक सुविधांसह अधिक चांगला धार्मिक अनुभव मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार सौ.वैशाली पाटील, श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सचिव, विश्वस्त, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी,पत्रकार तसेच स्थानिक मान्यवर,भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

**पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई ...**

उपस्थिती. दुपारी १.३० वाजता पाडळशिंगी येथून बीडकडे प्रयाण. दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व परळी तिर्थक्षेत्र विकास आणि विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ४ वाजता सह्याद्री फॅमिली रेस्टॉरंटचे उदघाटनास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह, बीडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ५.२० वाजता बीड, गेवराई व आष्टी मतदार संघाच्या कार्यकर्ते, अभ्यांगताच्या भेटीसाठी राखीव. रात्री ८ वाजतात बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण व रात्री १० वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

गुरुवार दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजता परळी, माजलगाव मतदार संघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव (स्थळ : शासकीय विश्रामगृह, परळी वैजनाथ), दुपारी १.१५ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ सकाळी ११ वाजता यशश्री निवासस्थान येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण. सकाळी ११.३० वाजता आगमन व जस्ट नॅचरल सेंद्रीय कॉप शॉपचे उदघाटनास उपस्थिती (स्थळ : आनंद नगर, अंबाजोगाई), दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत केज मतदार संघातील अभ्यांगतासाठी राखीव (स्थळ : जनसंपर्क कार्यालय, अंबाजोगाई), दुपारी ३.३० वाजता वाहनाने परळी वैजनाथकडे प्रयाण, दुपारी ४ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव. सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत परळी शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव.

शनिवार दि.१८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता निवासस्थान येथून मांजरसुंबा ता .बीडकडे प्रयाण, सकाळी ८.३० वाजता आगमन व भाजपा तालुका संपर्क कार्यालयास भेट देत सकाळी ९ वाजता बीड मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

---------

**राजेगाव येथे ऊसाच्या शेतात...**

घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा सुरू केला असून घटनास्थळावरील विविध बाबींची बारकाईने तपासणी करण्यात येत आहे. तसेच मृतदेहाची ओळख पटविण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यामुळे हत्या, आत्महत्या किंवा अन्य कोणते कारण आहे, याबाबत कोणताही निष्कर्ष काढणे सध्या उचित नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

या घटनेचा अधिक तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करीत असून मृत व्यक्तीची ओळख पटविणे आणि मृत्यूमागील नेमके कारण शोधण्याच्या दृष्टीने तपासाची चक्रे वेगाने फिरत आहेत.

------

**घरमालकाला खोलीत कोंडून...**

उघडण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या खोलीची कडी बाहेरून लावलेली असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ आपल्या पुतण्याला फोन करून बोलावले आणि दरवाजा उघडण्यास सांगितले.

घराबाहेर आल्यानंतर त्यांना शेजारी असलेल्या दोन खोल्यांचे कुलूप तुटलेले आणि कपाट उघडे दिसले. अज्ञात चोरट्यांनी कपाटातील ५०० रुपयांच्या ९०० नोटा असलेली ४ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम , १५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे झुंबर , ५ हजार रुपयांची नथ आणि १० हजार रुपयांची मण्याची पोत असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याशिवाय लगतच्या लव्हूळ नंबर-२ येथील रामेश्वर चव्हाण यांच्या घरीही चोरी झाल्याचे समोर आले आहे. वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्याम तोंडे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

-------

**जयंत पाटील यांनी माझ्या नादी लागू...**

फिरलो तर तुम्हालाही नीट सोडणार नाही. असे म्हणत त्यांनी थेट आव्हान दिले. याचवेळी त्यांनी देवांनी तुम्हाला जेवढे डोके दिले, त्याच्यापेक्षा एक टक्का आमच्या देवांनीसुद्धा जास्त दिले आहे, असे वक्तव्य करत विरोधकांवर उपरोधिक टीका केली.

धस यांच्या या विधानामुळे राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले असून त्यांच्या वक्तव्याची विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर धस यांच्या या इशाऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, आमदार सुरेश धस यांच्या या वक्तव्यावर जयंत पाटील किंवा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या वक्तव्यामुळे आगामी काळात दोन्ही नेत्यांमध्ये राजकीय शाब्दिक संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील राजकीय घडामोडींमध्ये हे वक्तव्य चर्चेचा विषय ठरले असून पुढे यावर कोणती प्रतिक्रिया उमटते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

------

**तुकाराम मुंढेंना साखर आयुक्त...**

आहे का? असा उपरोधिक सवाल थावरे यांनी उपस्थित केला.

साखर आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंढेंकडे दिल्यास शेतकऱ्यांच्या उसाला न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वासही थावरे यांनी व्यक्त केला.

------

**आ. संदीप क्षीरसागर यांच्या ...**

कायमचा मार्गी लागला आहे.

अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी बीड शहरात एक सुसज्ज वसतिगृह असावे, जेणेकरून जिल्ह्यातील विद्यार्थिनींना याचा फायदा होईल, यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी शासनस्तरावर सातत्याने आणि आग्रही पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांमुळे सदर वसतिगृहाच्या बांधकामास निधीसह प्रशासकीय मंजुरी यापूर्वीच मिळाली होती. मात्र, शहराच्या मध्यवर्ती भागात योग्य जागा उपलब्ध न झाल्याने प्रत्यक्ष कामात अडथळा निर्माण झाला होता. यावर उपाय म्हणून आ. क्षीरसागर यांनी बीड शहरातील किल्ला मैदान परिसरातील नगर परिषदेच्या मालकीची, परंतु सध्या निकामी असलेल्या डाक बंगल्याची जागा सुचवली होती. ही जागा नगर विकास विभागाच्या अखत्यारीत असल्याने, ती प्रथम महसूल व वनविभागाकडे वर्ग करणे कायदेशीररित्या आवश्यक होते. दरम्यान, १२ सप्टेंबर २००९ रोजी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमधील ठराव क्र.३४ नुसार सदरील नगरपरिषदेच्या मालकीची डाक बंगल्याची जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी देण्यास नगरपरिषदेने मंजुरी दिली होती. त्यानुसार सदरील जागेच्या महसूल विभागाकडे प्रत्यार्पणाची कार्यवाही तातडीने करण्याबाबत आ.क्षीरसागर यांनी चोख पाठपुरावा केला होता. त्यानुसार जारी झालेल्या शासन निर्णयानुसार (क्रमांक: एमयुएम-२०२५/प्र.क्र.४२९/नवि-१७), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ९२ (१) अन्वये बीड शहरातील किल्ला मैदान पीटीआर मालमत्ता क्र. जुना १-९-१६२ व नवा १-९-१७८ येथील एकूण २२३०.२२ चौ.मी. जागेपैकी २००० चौ.मी. इतकी जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास शासनाने रीतसर मान्यता दिली आहे. तसेच, बीड नगर परिषदेच्या मुख्यधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या समन्वयाने सदर जागा तातडीने हस्तांतरित करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या ऐतिहासिक यशानंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अत्यंत भावूक उजाळा दिला. तसेच, या प्रक्रियेला गती देऊन जागा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक विकास मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार व शासनाचे विशेष आभार मानले आहेत. जागा हस्तांतरणाची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच, अत्यंत आधुनिक आणि देखण्या वसतिगृहाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली असून, मुस्लिम व अल्पसंख्याक समाजाने याबद्दल आनंद व्यक्त करत आमदार क्षीरसागर यांच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले आहे.

--------

**श्री.येडेश्वरी मातेच्या चरणी मोहनराव...**

मातेची आरती करण्याचे भाग्य लाभणे ही माझ्यासाठी अत्यंत समाधानाची आणि आयुष्यातील अविस्मरणीय बाब आहे, असे सांगितले.

यावेळी त्यांनी श्री येडेश्वरी मातेच्या चरणी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंब सुखी, निरोगी आणि समृद्ध राहावे, सर्वांच्या जीवनात आनंद, ऐश्वर्य, उत्तम आरोग्य आणि मंगलमय वातावरण नांदावे, तसेच प्रत्येकाला सद्बुद्धी, शक्ती आणि यश प्राप्त व्हावे, अशी मनोभावे प्रार्थना केली. मोहनराव जगताप यांच्या या धार्मिक भेटीमुळे त्यांच्या श्रद्धाभावाचे दर्शन घडले असून, समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी देवीच्या चरणी केलेली प्रार्थना अनेकांच्या भावनांना स्पर्श करणारी ठरली. त्यांच्या या दर्शनाने आणि आरतीच्या पवित्र योगाने उपस्थित भाविकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# जल, वृक्ष आणि अर्थसमृद्धीकडे सिरसाळाची दमदार वाटचाल!

## लोकसहभागातून गाव बदलते, गाव बदलले की राष्ट्र समृद्ध होते –जलनायक मयंक गांधी
## ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्यामुळे बीड जिल्हा जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध होईल–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

सिरसाळा (प्रतिनिधी): जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या 'जलवृक्ष समृद्धी अभियानाला' सिरसाळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट (ऋत्तढ) आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून बीड जिल्ह्याला जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध बनविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, १०८ किलोमीटर नदी पुनरुज्जीवन आणि सिरसाळा येथील बुरुज व लेकुरवाळी या दोन तलावांचे खोलीकरण ही कामे मराठवाड्याच्या दुष्काळी भागासाठी आशेचा किरण आहेत. यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल. पाणी हेच जीवन असून, कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक वाढते. लोकसहभागातून उभी राहिलेली ही चळवळ केवळ जलसंधारणापुरती मर्यादित नसून तंटामुक्ती, नशामुक्ती आणि सामाजिक एकोपा निर्माण करणारी परिवर्तनाची सुरुवात आहे. या कामांचे जतन करण्याची जबाबदारी नागरिकांनी स्वीकारावी, तसेच जिल्हा प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी जलनायक मयंक गांधी म्हणाले की, ग्लोबल विकास ट्रस्टला या भागासाठी अजून खूप काही करायचे आहे. गावकऱ्यांचा जितका अधिक सहभाग मिळेल, तितक्या वेगाने विकासाची गती वाढेल. पुढील दोन वर्षांत केवळ सिरसाळाच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा चेहरामोहरा बदलण्याचा आमचा संकल्प आहे. जलसंचय, स्वच्छता, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून हा परिसर



जलवृक्ष समृद्ध बनविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे. एकोप्यातून समृद्धीची कास धरूया आणि राष्ट्राला सधन–संपन्न बनवूया. मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त भागात जलनायक मयंक गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू असलेले हे कार्य अत्यंत प्रेरणादायी असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. जलसंधारण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनेकपटीने वाढ होऊन आर्थिक समृद्धीचा नवा मार्ग खुला झाल्याचे त्यांनी सांगितले.

अनुसया मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार विनोद रनवारे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, डॉ. हरिश्चंद्र वँगे, डॉ. सदाशिव देशपांडे, सरपंच शेख नशीब यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी सरस्वती नदी पुनरुज्जीवन प्रकल्प तसेच पूर्णत्वास आलेल्या दोन्ही तलावांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रास्ताविकात सरपंच शेख नशीब यांनी सांगितले की, एक काळ असा होता की सिरसाळ्यात येणाऱ्या प्रत्येकाला पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत होते. गेल्या पन्नास वर्षांपासून गावाने तीव्र दुष्काळ सहन केला. आम्ही जलनायक मयंक गांधी यांच्याकडे एका तलावाच्या खोलीकरणाची विनंती केली होती; मात्र ऋत्तढ ने दोन तलावांचे काम पूर्ण करून गावाच्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय केला. आता गावात तीन लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला असून, आगामी काळात सिरसाळा 'जलवृक्ष समृद्ध गाव' म्हणून राज्यात आदर्श निर्माण करेल.

उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनीही सिरसाळ्यातील जलसंधारण, वृक्षलागवड आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या लोकसहभागातून राबविल्या जाणाऱ्या विकासकामांचे विशेष कौतुक केले.

**शाश्वत विकासाचे नवे पर्व!**

जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि आर्थिक उन्नती या त्रिसूत्रीच्या बळावर सिरसाळा आता शाश्वत विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असून, बीड जिल्ह्यासाठी हा उपक्रम आदर्श विकास मॉडेल ठरत असल्याची भावना संपूर्ण कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत कंत्राटी नोकरीसाठी अर्ज सादर करावेत

बीड(प्रतिनिधी): जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या वीरपत्नी आणि अवलंबितांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजगाराची उत्तम संधी चालून आली आहे. बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहांमध्ये विविध पदावर तात्पुरत्या, रोजंदारी आणि कंत्राटी स्वरूपात भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कंत्राटी भरतीमध्ये वसतिगृह अधीक्षक (१ पद), सहाय्यक वसतिगृह अधीक्षक (२ पदे), चौकीदार (२ पदे), महिला स्वयंपाकी (४ पदे), माळी कामगार (१ पद) आणि सफाई कामगार (२ पदे) अशा पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना विशेष प्राधान्य दिले जाणार असले, तरी नागरी उमेदवारांनाही या पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज करणारा उमेदवार निर्व्यसनी असणे अत्यंत आवश्यक आहे. यातील चौकीदार हे पद निवासी स्वरूपाचे असल्याने त्यांच्या कामाची वेळ २४ तासांची असेल, तर सहाय्यक वसतिगृह अधीक्षक पदासाठी संगणकाचे ज्ञान आणि टायपिंग अवगत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करायचे आहेत. अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र आणि आधारकार्ड यांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख नंतर कळवण्यात येईल. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त माजी सैनिक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले असून, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४४२–२२२१०५ या संपर्क क्रमांकावर विचारणा करावी. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा माजलगावकरांनी थाटात साजरा केला निरोप समारंभ

माजलगाव (प्रतिनिधी) येथील शहर पोलीस



ठाण्यात कार्यरत असलेले अतिशय शिस्तप्रिय असलेले पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा माजलगावकरांनी थाटात साजरा केलेला निरोप समारंभ म्हणजे त्यांनी माजलगावकराकडून मिळवलेली कामाची पावतीच म्हणावी लागेल.

या अगोदरही या खाकीत आलेले पोलीस निरीक्षक आले अन गेले पण त्यांना जे जमले नाही ते यांनी शहरवासियांशी जुळवून घेतलेली नाळ. खाकीत असूनही आपलेशे वाटणारे व्यक्तिमत्व आहे.भले मग ते निवडणुकीचा कालावधी असो कि आर्वजनिक जयंतीचा कालावधी असो. लोकांना लोकासाठी लोकांच्या मनातील हवे असणारे काम ते अमलात आणत असत.

# जात पडताळणी विभाग,बीड येथील गैरकारभाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा–डॉ.जितेंद्र ओव्हाळ

बीड(प्रतिनिधी): जात पडताळणी विभाग, बीड येथील अभिलेखापालाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ३ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडल्याची घटना अत्यंत गंभीर असून, यामुळे संपूर्ण कार्यालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची केवळ संबंधित कर्मचाऱ्यापुरती मर्यादा न ठेवता संपूर्ण कार्यालयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी केली आहे.



डॉ. ओव्हाळ म्हणाले की, जर कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांकडून कामासाठी लाचेची मागणी होत असेल, तर त्यामागील संपूर्ण साखळी उघड करणे आवश्यक आहे. त्यामुळे या कार्यालयातील प्रशासकीय कामकाज, प्रलंबित प्रकरणे, आर्थिक व्यवहार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.यासोबतच, या कार्यालयाचे प्रभारी व उपआयुक्त उमेश सोनवणे यांच्या कार्यकाळातील कारभाराचीही सखोल चौकशी करून, कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास त्यांच्यावरही नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. डॉ. ओव्हाळ यांनी इशारा दिला की, भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाल्यास किंवा या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ झाल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी मंच रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने संघर्ष करेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# प्रभाग क्र. १० कोरबू गल्लीतील अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पी.टी.आर. वाटप करा : सय्यद एजाज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील कोरबू गल्ली परिसरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या गरीब व गरजू अतिक्रमण धारकांचे तातडीने सर्वेक्षण करून पात्र कुटुंबांना पी.टी.आर. (Property Tax Register) वाटप करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी गेवराई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, कोरबू गल्ली परिसरात अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहत असून त्यांच्या घरांची नोंद अधिकृत पी.टी.आर.मध्ये नसल्यामुळे त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत आहेत. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना) अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी जागेचा अधिकृत पुरावा म्हणून पी.टी.आर. आवश्यक असल्याने अनेक पात्र कुटुंबे घरकुलाच्या लाभापासून वंचित राहत आहेत.सध्या या परिसरातील अनेक नागरिक कच्च्या व जीर्ण घरांमध्ये वास्तव्यास असून पावसाळ्यासह इतर ऋतूंमध्ये त्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने या भागातील सर्व अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करावी आणि नियमानुसार त्यांना पी.टी.आर. वाटप करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी सय्यद एजाज यांनी केली आहे. घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन या विषयाला नगरपरिषद प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे, जेणेकरून गरीब व गरजू कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घरकुल मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# तहसीलचा कारभार चव्हाट्यावर

## मृत व्यक्ती जिवंत दाखवून खोटे हयात प्रमाणपत्र,बनावट कागदपत्रे तयार करून घेतला शासकीय लाभ; आमरण उपोषण चालु

माजलगाव (प्रतिनिधी)येथील जवळच असलेल्या शेलापुरी येथील गोविंद भगवान जाधव रा.शेलापुरी ता. माजलगाव जि.बीड येथील रहिवाशी असुन त्यांची आई नामे सत्यभामा भगवान जाधव रा.शेलापुरी ही व्यक्ती दि.१/१/१९९८ साली मयत झालेली आहे. सत्यभामा जाधव ही मृत व्यक्ती जिवंत असल्याचे दाखवून,बनावट हयात प्रमाणपत्र,खोटी कागदपत्रे व दोन वेगवेगळ्या नावांनी आधार/खोटी ओळख वापरून अंदाजे २२ वर्षांपासून शासनाचे विधवा अनुदान /पेन्शन बेकायदेशीररीत्या घेत शासनाची आर्थिक फसवणूक केलेली आहे. सदर फसवणूक करणाऱ्या व्यक्तीचे मुळ नाव विजयमाला शिवाजी जाधव रा. शिवाजीनगर माजलगाव असे असून त्यांचा आधार क्रं. ८१०४ १४५७ ६१३१ असा आहे. या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या नावे बनावट आधार कार्ड बनविलेले आहे. या बाबत मा. तहसीलदार माजलगाव यांना दि.१६/४/२०२६



पत्राद्वारे कळविलेले आहे.त्यावरुन तहसीलदार यांनी अर्जदारस पत्र देवून कळविले की, संबंधीत व्यक्तीचे संजय गांधी निराधार अनुदान योजने अंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य बंद करण्यात येईल.परंतु अद्यापर्यंत संबंधीत फ्रॉड व्यक्तीविरुध्द तहसील कार्यालयामार्फत कोणतीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

म्हणुन अर्जदाराने आज दि. १३/७/२०२६पासुन तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण चालु केले आहे.या प्रकरणात शासनाच्या नोंदींमध्ये फेरफार, खोटी पडताळणी व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या सहभागाची शक्यता नाकारता येत नाही. सदर प्रकार हा गंभीर आर्थिक व दस्तऐवजी गुन्हा असून आरोपींविरुद्ध तात्काळ चौकशी व फौजदारी कारवाई होणे आवश्यक आहे.

त्यामुळे संबंधित आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता,आधार ऍक्ट २०२३ व इन्फॉर्मशन टेकनॉलॉजि ऍक्ट २००० अंतर्गत लागू कलमानुसार ऋखठ दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच हे अमरण उपोषण न्याय मिळेपर्यंत चालु ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्त्याने केला आहे.

# एससी व एसटी प्रमाणे ओबीसी जनगणना झालीच पाहिजे

## सावता परिषद आयोजित ओबीसी चर्चासत्रातील सूर

बीड(प्रतिनिधी): आंदोलनाची रणनिती व दिशा ठरविण्यासाठी सावता परिषदेच्या वतीने आयोजित ओबीसीच्या विविध संघटनाचे प्रमुख मान्यवर व जिल्हाध्यक्ष यांच्या उपस्थितीत बीड येथे पार पडलेले चर्चासत्र अतिशय महत्वपूर्ण, उत्साहवर्धक, एकजूट दर्शविणारे तसेच चळवळीला चालना देणारे ठरले! केवळ तनाने नव्हे तर मनाने सर्वजण एकत्रित आल्याचा प्रत्यय आला.

बीड येथील चर्चासत्रात ओबीसी समूहातील विविध जातींच्या तब्बल ८० समाज संघटनांच्या २८० प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग या चर्चासत्राची व्याप्ती व वैशिष्ट्ये दर्शवीत होता. यापैकी अनेक जणांनी चर्चेत सहभाग नोंदवत उपयुक्त सूचना सुचवून व्यापक व तीव्र आंदोलने छेडण्यासाठी निर्धारपूर्वक मूठी आवळल्या.

निमंत्रक सावता परिषदेचे संस्थापक कल्याण आखाडे प्रास्ताविकपर बोलताना म्हणाले की, हा लढा कोणता पक्ष अथवा सरकार यांच्या विरोधात अथवा समर्थनार्थ नसून ओबीसीच्या जिव्हाळ्याचा प्रश्नासाठी असल्याचे स्पष्ट केले. जनजागरण व जनआंदोलन या दोन्ही आघाड्यावर प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी सर्वांनी एकजुटीने साथ देण्याचे आवाहन करून राज्यभर ओबीसी जनगणना यात्रा काढण्याचा निर्धार जाहीर केला.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

ओबीसी प्रवर्गाच्या प्रश्नासाठी सातत्याने आवाज



उठविणारे प्रा.सुशीलाताई मोराळे, कल्याण काका आखाडे, श्री.बालाजीराव शिंदे, श्री.कल्याणराव दळे, मा.गुफ्रान अन्सारी, प्रा.विष्णू जाधव, इंजि.व्ही.व्ही.बन, डॉ.शिवाजीराव राऊत, श्री.बालासाहेब दोडतले, प्रा.पी.टी.चव्हाण, डॉ.लक्ष्मण जाधव यांच्या अभ्यासपूर्ण व प्रेरक मार्गदर्शनाने चर्चासत्रास वैचारिक उंची लाभली होती.

**आंदोलनाची रूपरेषा**

खासदारांना घेराव घालून निवेदने देणे, स्वाक्षरी अभियान राबवणे, ई–मेल करणे यासोबतच धरणे आंदोलने व मोर्चे काढणे यासाठी एकमत झाले.

**मान्यवरांची उपस्थिती**

याप्रसंगी लक्ष्मण ढवळे, शालिनी बुंधे, युवराज शिंदे, शरद भांडेकर, विष्णू देवकते, अर्जुन दळे, प्रकाश कानगावकर, गंगाधर पुरी, रमेश कैवाडे, सुधीर जाधव, परमेश्वर वाघमोडे, बापूराव भालेकर, बप्पा घुगे, रफिक बागवान, प्रकाश कोंका, अर्जुन बहिरवाळ, लक्ष्मण गुंजाळ, राजेंद्र जव्हेरी, गणेश जगताप, गणेश पुजारी, सय्यद साजेदभाई, सादेकभाई अंबानी, शेख जाकेरभाई, मीनाक्षी देवकते, सुघोष मुंडे, अनिल मुळेकर, राजू ताटे, मतकर सर, राजेश शिंदे, दगडू गायकवाड, अभय बिडकर, भूषण पवार, रमेश राऊत, मंगेश लोळगे, संभाजी गुरव, लहू गव्हाणे, अविनाश शिंगनाथ, अजिंक्य आनेराव, विशाल राऊत, सुरेश असलेकर, हाशमभाई बागवान, हारुणभाई बागवान, बंडू खांडेकर, सुरेंद्र कावरे, संजीवनी राऊत, दगडू म्हेत्रे, दिनेश गायकवाड, राजेश गवळी, मुकेश शिवगन, एकबालभाई शिकलकर, खुदुसभाई आतार, इब्राहिमभाई तांबोळी, बाबूभाई आतार, मौलाना इकबाल कुरेशी, लक्ष्मणसिंह ठाकूर, दिपक चौगुले, बाबूलाल ढोरमारे, किशोर शिंदे, गुलाब चव्हाण, कृष्णा संकोड, माऊली शिरसाट, रामेश्वर पवार, रामेश्वर सोनटक्के, प्रधान पवार, कैलास काटे, कैलास रंगदळ, रवी गंगावणे, दत्ता परदेशी, संतोष पाबळे, रामेश्वर कानडे, कृष्णा उपरे, अतुल कासार, परमेश्वर जाधव उपस्थित राहत चर्चेत महत्वपूर्ण सहभाग घेतला.

**यशस्वीतेसाठी परिश्रम**

सावता परिषदेचे पदाधिकारी डॉ.राजीव काळे, किशोर राऊत, विष्णु खेत्रे, प्रा.रणजीत आखाडे, सुनिल शिंदे, अशोक हजारे, राजाभाऊ गवळी, शामराव शिंदे, महादेव कदम, दादासाहेब चौधरी, सुधीर चौधरे, बाबा वाघुले, बाळासाहेब रासवे, लक्ष्मीकांत शिंदे, दत्ता ढवळे, राधेशाम लेंडाळ, हनुमान गायकवाड, बाबासाहेब शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

### आयु.आनंदराव पुंडलिक भालेराव सेवानिवृत्त शिक्षक यांचे दु :खद निधन

माजलगाव (प्रतिनिधी) आयु.आनंदराव पुंडलिक भालेराव सेवानिवृत्त शिक्षक, संस्थापक सचिव



मागासवर्गीय शिक्षक महासंघ,अध्यक्ष श्रावस्ती बुद्धविहार बांधकाम समिती आनंदनगर,हिंगोली रा.चोंडी बुद्रुक तालुका सेनगाव ह. मु.आनंदनगर,हिंगोली यांचे दि. ११ जुलै २०२६ शनिवार रोजी सायंकाळी ८:४० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.ते ७४ वर्षांचे होते.

त्यांचे पार्थिवावर अंत्यविधी संस्कार दिनांक १२ जुलै २०२६ रविवार रोजी सकाळी ११:३० वा.हिंगोली येथील पॉवर हाऊस अकोला – वाशीम रोड येथील स्मशानभूमीत संपन्न झाला.तसेच त्यांचा पुण्यानुमोदन चा कार्यक्रम दि. २०जुलै २०२६ सोमवार रोजी होईल.ते दिपक आनंदराव भालेराव, जि.प.शिक्षक मंजरथ ता. माजलगाव यांचे वडील होत. त्यांचे पश्चात चार बहिणी एक भाऊ,दोन मुले,तीन मुली,सुना,जावाई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# मैत्रीणीनेच केला विश्वासघात; साडी मागण्याच्या बहाण्याने घरातून २ लाख ३४ हजाराचे दागिने व रोकड लंपास

बीड(प्रतिनिधी): साडी मागण्याच्या बहाण्याने घरात प्रवेश करून एका महिलेने आपल्याच मैत्रीणीच्या घरातील लाखो रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी वनदेव भास्कर सुळे (वय ३१, रा. जवाहर कॉलनी, बीड) हे पेशाने वकील आहेत. त्यांची पत्नी सपना यांची मैत्रीण दिया नानासाहेब मते (रा. गंगावाडी, ता. गेवराई) ही १७ एप्रिल रोजी दुपारी लग्नासाठी साडी मागण्याच्या बहाण्याने सुळे यांच्या घरी आली होती. त्यानंतर तिने वारंवार सुळे यांच्या घरी येणे-जाणे सुरू ठेवले. या दरम्यान सपना घरात कामात व्यस्त असल्याचे पाहून दियाने कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि पर्समधील रोकड चोरून नेली. १५ मे रोजी घरातील दागिने बेपत्ता असल्याचे सपना यांच्या निदर्शनास आले.

या चोरीबाबत सुळे यांनी पोलिसांत तक्रार अर्ज दिला होता. महिला पोलीस अंमलदार राठोड यांनी संशयित दिया मते हिला चौकशीसाठी बोलावले असता, तिने उपस्थित पोलीस अधिकारी व फिर्यादी यांच्यासमोर चोरी केल्याची कबुली दिली. चोरलेले दागिने शहरातील डी. के. ज्वेलर्स आणि दिपाली ज्वेलर्स येथे मोडल्याचे तिने सांगितले. दियाने ५ जुलैपर्यंत दागिने परत आणून देण्याचे कबूल केले होते, मात्र तिने दागिने न दिल्याने अखेर हा गुन्हा नोंदवण्यात आला.

या चोरीत ६६ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या तीन अंगठ्या, ९६ हजार रुपयांचे मिनी गंठण, ७ हजार ५०० रुपयांची सोन्याची नथ, ६ हजार रुपयांची सोन्याची अंगठी, ३३ हजार ७५० रुपयांचे चांदीचे दागिने आणि २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २ लाख ३४ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बालाजी सुरेवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## नगर परिषदेकडून मालमत्ता नोंदींच्या प्रती देण्यास टाळाटाळ; नागरिकांची होत आहे फरफट-राकेश साळवे

### पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा गंभीर आरोप; माहिती तातडीने न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

माजलगाव : (प्रतिनिधी) माजलगाव नगर परिषद प्रशासनाकडून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेशी संबंधित आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देण्याऐवजी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीने केला आहे. मालमत्ता क्रमांक २९/५१५ संदर्भातील दि. १२ जून २०२६ पर्यंत झालेल्या सर्व नोंदी व आदेशांच्या प्रमाणित प्रती मिळण्यासाठी नियमानुसार अर्ज करूनही जवळपास महिनाभर उलटला तरी माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा आरोप पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

याबाबत पक्षाचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे आणि विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाणे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून संबंधित मालमत्तेचे नामांतर आदेश, गहाणखत आदेश, हक्कसोड आदेश, वारसाहक्क आदेश, बक्षीसपत्र आदेश तसेच इतर सर्व नोंदींच्या प्रमाणित प्रती तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की संबंधित मालमत्तेप्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने या कागदपत्रांची अत्यंत तातडीने आवश्यकता आहे. मात्र अर्ज करूनही संबंधित अधिकारी व कर्मचारी माहिती देण्यास टाळाटाळ करत असून नागरिकांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



विशेष म्हणजे, मुख्याधिकारी लक्ष्मण धस व विघ्नेश मुंडे यांनी संबंधित कागदपत्रांसाठी माहितीचा अधिकार (आरटीआय) अंतर्गत अर्ज करण्याचा सल्ला दिल्याचे राकेश साळवे म्हटले आहे. नियमित प्रक्रियेत उपलब्ध करून देता येणाऱ्या कागदपत्रांसाठीही नागरिकांना आरटीआयचा आधार घ्यावा लागणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची कबुली असल्याची टीका या वेळी राकेश साळवे यांनी केली. नगर परिषदेकडे माहितीच्या अधिकाराखाली दाखल झालेले अनेक अर्ज आजही प्रलंबित असून त्यावर कोणतीही प्रभावी कार्यवाही होत नसल्याचा आरोपही पक्षाने केला आहे.संबंधित अधिकारी केवळ उडवाउडवीची उत्तरे देत असून माहिती देण्याची जबाबदारी टाळत असल्याचेही स्पष्ट झाले आहे. नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मालमत्तेच्या सर्व प्रमाणित प्रती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने कायदेशीर लढा उभारण्याबरोबरच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राकेश साळवे व सिद्धार्थ ससाणे यांनी दिला आहे.

## सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा; बीड येथे जिल्हास्तरीय स्पर्धेस १६ जुलैपासून सुरुवात

बीड(प्रतिनिधी): देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यांना दि.१६ जुलै २०२६ पासून बीडमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांचा शानदार शुभारंभ होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर दि. १६ आणि १७ जुलै २०२६ या कालावधीत ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. १६ जुलै २०२६ रोजी १७ वर्षांखालील मुले आणि मुलींचे सामने, १७ जुलै २०२६ रोजी १५ वर्षांखालील मुलांचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. १७ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. १५ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच, १५ वर्षांखालील खेळाडूंना एआयएफएफ मान्यताप्राप्त वय निश्चितीबाबतची चाचणी करून घेणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज आणि प्रवेश शुल्क पावती दि. ११ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सर्व खेळाडू व संघांची ु.ीर्लीीलीं.ळिप या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे. केवळ नोंदणीकृत आणि प्रवेश फी भरलेल्या संघांनाच स्पर्धेत प्रवेश दिला जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सरस कामगिरी करणाऱ्या संघांची पुढे विभागस्तर आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाईल. राज्यस्तरीय स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या संघाला नवी दिल्ली येथे 'सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी'तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या मुख्य राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल सुब्रतो मुखर्जी यांच्या स्मरणार्थ १९६० पासून ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर तळागाळातील फुटबॉलला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाते. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी क्रीडा अधिकारी कालिदास होसुरकर (भ्रमणध्वनी-९४२१५९५५१५) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

## आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान आयुक्त तुकाराम मुंडे यांना द्यावा : भाई थावरे

बीड (प्रतिनिधी) यंदाच्या आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील शासकीय महापूजेचा मान आयुक्त तुकाराम मुंडे यांना देण्यात यावा, अशी मागणी शेतकरी नेते तथा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री व संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये तुकाराम मुंडे हे कर्तव्यदक्ष, निस्वार्थी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती संवेदनशील अधिकारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्रात त्यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळताना जनहिताचे निर्णय घेतले असून, सध्या दूध, औषधे आणि अन्नपदार्थांमधील भेसळ उघडकीस आणण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईमुळे जनजागृती होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शेतकरी संघर्ष समितीच्या बैठकीत एकमुखी ठराव करून यंदाच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान तुकाराम मुंडे यांच्या हस्ते व्हावा, अशी भूमिका घेण्यात आल्याचे भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले.

तुकाराम मुंडे हे शेतकरी कुटुंबातील असून, सामान्य शेतकऱ्याच्या मुलाने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर उच्च प्रशासकीय पद गाठले आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून त्यांना हा मान देण्यात यावा, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.















Dongarcha Raja Newspaper Printed, Published and Owned by **Waghmare anil shriram** and Printed at **Shri Jagmitra Printers & Sales Corporation,** Sumati Nagar, Jalna road, Beed, Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and published at Dongarcha raja, Main Road, wadvani, Tq.Wadvani, District Beed. 431144 (Maharashtra) **Editor : Waghmare anil shriram**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **वाघमारे अनिल श्रीराम** यांनी श्री जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कार्पोरेशन, सुमतीनगर, जालना रोड, बीड जि.बीड - पिन- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून डोंगरचा राजा कार्यालय,मेन रोड, वडवणी, ता.वडवणी जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. फोन - ९४२२५९१८०५, निवासी संपादकः डॉ.एल.बी.वाघमारे, **संपादक- वाघमारे अनिल श्रीराम** (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)